जा.सुसंकें/प्रक्षेत्र सहा./जाहिरात/१९६/२०२४
सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन
दिनांक:— ०८/०७/२०२४

प्रति,

**मा. संचालक विस्तार शिक्षण,**
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली जि. रत्नागिरी

**विषय:**— विद्यापीठ संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेबाबत....
**संदर्भ:**— जा.क्र. डॉबासाकोकृवि/संशो—३/१०६१/२०२४, दि. ०४/०६/२०२४

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथे प्रक्षेत्र सहाय्यक (कंत्राटी) या पदाची तात्पुरती नेमणूक अकरा महिने कालावधकरीता करावयाची आहे. त्यानुषंगाने प्रक्षेत्र सहाय्यक (कंत्राटी) या पदासाठी अर्ज मागविणेसंबंधीची जाहिरात सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

तरी कृपया सदरील जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**सोबत**: वरीलप्रमाणे.

(सि.ना. सावंत),
प्रभारी अधिकारी,
सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन,
ता. श्रीवर्धन, जि. रायगड

**प्रत:**

१. मा. संशोधन संचालक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड.
३. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी यांना कार्यवाहीसाठी सविनय सादर.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी

सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड.

जा.क्र.सुसंकें/प्र.सहा./१९६/२०२४ दिनांक: ०८/०७/२०२४

## जाहिरात

सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन येथे प्रक्षेत्रावरील विविध कामे करून घेण्यासाठी 'विद्यापीठ महसुली उत्पन्न' या योजनेत कंत्राटी पद्धतीने प्रक्षेत्र सहाय्यकाची आवश्यकता आहे. निसर्ग चक्रीवादळानंतर झालेल्या सुपारी, नारळ, दालचिनी, काळीमिरी इत्यादी बागांच्या नुकसानीमुळे सुपारी, नारळ, दालचिनी, काळीमिरी इ. रोपांना मोठया प्रमाणात मागणी आहे. त्यामुळे सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन येथील रोपवाटीकेत मोठया प्रमाणावर सुपारी रोपे तयार करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले आहे. तसेच विद्यापीठ परिभ्रमण निधी अंतर्गत सुपारी, पपनस, काळीमिरी, रामफळ, जायफळ, दालचिनी, नीरफणस, कडीपत्ता इत्यादी फळपिके व मसाला पिकांची रोपे/कलमे तयार करणे, शोभिवंत झाडे आणि औषधी वनस्पती यांच्या कुंडया तयार करणे, त्यांचे संगोपन करणे, नोंदी ठेवणे, विक्री करणे, निविष्ठा खरेदी करणे व त्यांच्या नोंदी ठेवणे, मजुरांकडून प्रक्षेत्रावरील कामे करून घेणे, प्रक्षेत्रावरील लागवड केलेल्या सुपारी व इतर फळझाडे व मसाला पिकांच्या झाडांची देखभाल करणे, खत व्यवस्थापन करणे, कीडनाशक/बुरशीनाशक फवारणे, तण आणि पाणी व्यवस्थापन करणे, मजुरांवर नियंत्रण ठेवणे व त्यांच्याकडून सुव्यवस्थित कामे करून घेणे इत्यादींसारखी कामे करणेकरीता आणि नव्याने प्राप्त झालेल्या दिवेआगर येथील पाच एकर प्रक्षेत्राच्या विकासात्मक कामे करण्याकरीता तसेच इतर दैनंदिन कामकाजाकरीता ०१ कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यकाची नेमणूक करणे आवश्यक आहे.

तरी सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन येथील प्रक्षेत्रावरील व कार्यालयातील कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी ११ महिने कालावधीसाठी **०१ कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक** पद निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात भरण्यासाठी खालील तपशिलाप्रमाणे पात्र उमेदवारांनी शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह **दिनांक २२/०७/२०२४ रोजी सायंकाळी** ०५:०० वाजेपर्यंत या कार्यालयास पोहचेल असे अर्ज पाठवावे. लखोटयावर **'कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक'** पदासाठी अर्ज असे लिहून **मा. प्रभारी अधिकारी, सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड ४०२११०** या पत्त्यावर हातबटवडा किंवा पोस्टाद्वारे पाठवावे. अर्ज छाननी नंतर पात्र व अपात्र उमेदवारांची यादी मुलाखत दिनांक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात येईल.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | एकत्रित वेतन प्रति महिना (रू.) | नेमणुकीचा कालावधी | योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक | ०१ | १६,०००/— | ११ महिने | सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन 'विद्यापीठ महसुली उत्पन्न' |

### "कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक" या पदासाठी किमान आवश्यक अर्हता

| | |
|---|---|
| १. कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक | १. उमेदवार हा विद्यापीठ मान्यता प्राप्त संस्थेमधुन कृषि पदविका किंवा कृषि पदवीधर असावा.<br>२. कार्यालय/प्रक्षेत्रावरील कामाचा किमान ०३ वर्ष अनुभव असावा.<br>३. MS-CIT/CCC संगणकीय हाताळणी कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>४. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठामध्ये काम केल्याचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |

अटी व शर्ती :

१. वयोमर्यादा – खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता ३८ व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांकरिता ४३ वर्षे राहील.
२. उमेदवारांनी विहीत प्रपत्रामध्ये पूर्ण तपशील अर्ज सादर करावा. अर्ज **मा. प्रभारी अधिकारी, सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन, जि. रायगड** यांचे नावे सादर करावा.
३. लखोटयावर **कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक** या पदासाठी अर्ज **सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन, जि. रायगड 'विद्यापीठ महसुली उत्पन्न'** या योजनेंतर्गत असे लिहीलेले असावे.
४. पात्र उमेदवारांची निवड समितीद्वारे मुलाखत घेण्यात येईल.
५. मुलाखतीच्यावेळी अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
६. मुलाखतीसाठी बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना कोणताही प्रवासभत्ता तसेच दैनंदिन भत्ता अनुज्ञेय असणार नाही.
७. निवड झालेल्या उमेदवाराला नेमणुकीच्या आदेशातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा विहित नमुन्यात रु. १०० किमतीच्या स्टॅम्प पेपरवर लिहून द्यावा लागेल.
८. उमेदवाराला सदर योजनेतील नेमणुक पुढे चालू ठेवण्यासाठी तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीच्या नियमीत आस्थापनेवर नियुक्तीसाठी दावा करता येणार नाही.
९. उमेदवाराला नोकरी सोडून जाण्याची इच्छा असल्यास एक महिन्याची आगाऊ सूचना द्यावी लागेल अन्यथा एक महिन्याचे वेतन भरणा करावे लागेल.
१०. निम्नस्वाक्षरीकार यांना प्राप्त अर्ज/सर्व अर्ज कोणतेही कारण न दाखविता नाकारण्याचा अधिकार राहील.
११. कार्यालयाच्या कामकाजाची वेळ ०९:०० ते १७:३० अशी राहील तथापि, एखाद्या दिवसाचे काम वाढल्यास काम पूर्ण होईपर्यंत थांबावे लागेल किंवा काम पूर्ण करण्यासाठी लवकर यावे लागेल.
१२. सुट्टीच्या दिवशी कामाच्या निकडीनुसार उपस्थित रहावे लागेल.
१३. जादा केलेल्या कामाचा कोणताही मेहनताना देण्यात येणार नाही.
१४. काम समाधानकारक न वाटल्यास त्याच्या सेवा कोणत्याही दिवशी समाप्त करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांना राहतील.
१५. सदर तात्पुरती नियुक्ती अकरा महिने कालावधीकरीता राहील. निम्नस्वाक्षरीकारांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी सदर नियुक्ती/नेमणूक समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
१६. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एसएलपी–५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्तीवरील उमेदवारास विद्यापीठ सेवेत कायमस्वरुपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.
१७. कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास उमेदवाराची नेमणुक रद्द होऊ शकते.
१८. कोणत्याही टपाल विलंबासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
१९. कोणत्याही स्वरुपात राजकारणात सहभाग आढळून आल्यास उमेदवाराला या पदासाठी अपात्र ठरवले जाईल.
२०. वयाचा लाभ/फायदा घेण्यासाठी उमेदवाराने नॉनक्रिमीलेअर/जातीचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.
२१. नावामध्ये बदल असल्यास गॅझेट (राजपत्र) जोडण्यात यावे.
२२. प्रमाणपत्रे सत्यप्रतीत/स्वयंसाक्षांकीत असल्यास स्वयंघोषणापत्रासह जोडणे आवश्यक आहे.
२३. अर्जावर उमेदवाराने पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा.

ठिकाण : श्रीवर्धन
दिनांक : ०८/०७/२०२४

प्रभारी अधिकारी,
सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन,
जि. रायगड

प्रत, माहिती व प्रसिद्धीसाठी...

१. मा. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली.
सदरची नोटीस विद्यापीठ संकेतस्थळावर कृपया प्रसिद्ध करण्यात यावी.
२. मा. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय श्रीवर्धन, जि. रायगड
३. मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन, जि. रायगड
४. मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, श्रीवर्धन, जि.रायगड
५. नोटीस बोर्ड, सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन

# अर्जाचा नमुना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | :— | |
| २ | ई—मेल | :— | |
| ३ | पदाचे नाव | :— | |
| ४ | योजनेचे नाव | :— | |
| ५ | पत्रव्यवहारासाठी पत्ता | :— | |
| ६ | जन्म तारिख | :— | |
| ७ | दिनांक.......... रोजी वय | :— | ............. वर्ष ........... महिने ....... दिवस |
| ८ | धर्म/जात | :— | |
| ९ | दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | :— | |
| १० | शैक्षणिक अर्हता | :— | |

| परीक्षा | बोर्ड/महाविद्यालयाचे/शाळेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

अनुभव :—

| पदाचे नाव | कालावधी | | कामाचे स्वरूप | कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |

इतर :—

मी असे लिहून देतो/देते की, वर दिलेली सर्व माहिती बरोबर असून, ती सत्य आहे. तसेच सदर माहिती खोटी आढळून आल्यास उपरोक्त पदासाठी मी पात्र नसेन याची मला जाणीव आहे.

दिनांक:—

ठिकाण:— उमेदवाराची सही

प्रपत्र — अ

स्वंघोषणापत्र

मी ........................................ श्री ........................................ यांचा मुलगा/मुलगी वय ............ वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) .................. ....... व्यवसाय .................. राहणार .......................................... याद्वारे घोषित करतो/करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधीत कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण:— ....................... अर्जदाराची सही:—

दिनांक:— / /२०२४ अर्जदाराचे नाव:— ..................................

प्रपत्र — ब

स्वंय— साक्षांकनासाठी स्वंय घोषणापत्र

मी ........................................ श्री ........................................ यांचा मुलगा/मुलगी वय ............ वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) ......................... व्यवसाय .................. राहणार ............................................ याद्वारे घोषित करतो/करते की, मी स्वंय साक्षांकीत केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधीत कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण:— ......................  अर्जदाराची सही:—

दिनांक:— / /२०२४  अर्जदाराचे नाव:— ..................................